पुणे विभागातील अतिरिक्त राज्यस्तरीय कार्यालये इतर विभागीय आयुक्तांकडे बिंदु नामावली तपासणी व आरक्षण निश्चिती करीता वर्ग करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन परिपत्रक क्रमांकः बीसीसी-२०१८/प्र. क्र. १३७A/१८/१६-ब

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

दिनांक: २१ मार्च, २०१८

<u>वाचा:-</u> १) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी २०१५/प्र.क्र.१२६/१६-ब, दि.५ मे,२०१५

२) विभागीय आयुक्त, पुणे यांचे पत्र क्र.मावक/वशी.२१०३/२०१७, दिनांक २९.८.२०१७

<u>प्रस्तावना:-</u>

मंत्रालयीन प्रशासकिय विभागाच्या अधिनस्त सर्व राज्यस्तरीय विभाग प्रमुखांच्या नियंत्रणाखालील विभागीय स्तरावरील गट-ब आणि गट-अ (कनिष्ठ श्रेणी) या संवर्गातील पदोन्नती करीता आरक्षण निश्चितीचे व बिंदुनामावली तपासणी व प्रमाणित करण्याचे अधिकार संदर्भाधीन शासन निर्णयान्वये विभागीय स्तरावर विभागीय आयुक्त यांना प्रदान करण्यात आले आहेत. त्यामुळे मागासवर्ग कक्षाचे काम मोठया प्रमाणामध्ये वाढले आहे. पुणे विभागाअंतर्गत पुणे शहरामध्ये मंत्रालयीन प्रशासकिय विभागांच्या अधिनस्त सर्व राज्यस्तरीय विभाग प्रमुखांच्या कार्यालयांची/ संचालनालयांची संख्या ही इतर विभागांच्या तुलनेमध्ये मोठया प्रमाणात आहे. ही वस्तुस्थिती विचारात घेता, संदर्भाधिन शासन निर्णयामधील परि. ६ मधील तरतुदीनुसार पुणे विभागीय आयुक्तांच्या कार्यक्षेत्रातील कामकाजाचा व्याप विचारात घेता, त्यांच्या कार्यक्षेत्रातील राज्यस्तरीय शासकीय कार्यालयाचे तसेच मोठया राज्यस्तरीय शैक्षणिक संस्थाच्या कार्यभाराचे विभाजन करुन अशा कार्यालयाची /शैक्षणिक संस्थाची बिंदू नामावली अन्य विभागीय आयुक्तांकडून प्रमाणित करुन घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन परिपत्रक :-

बिंदुनामावली तपासणीची कामे तत्परतेने होण्याच्या दृष्टीने पुणे विभागातील बिंदुनामावली तपासणीच्या कामकाजाचे वाटप विभागीय आयुक्त, पुणे,नाशिक व औरंगाबाद यांच्या अधिनस्त असलेल्या सहायक आयुक्त, मागासवर्ग कक्ष यांच्याकडे खालील तत्क्यात दर्शविल्यानुसार करण्यात येत आहे.

अ.क्र.	विभागाचे नाव	राज्यस्तरीय शासकीय कार्यालयाचे नाव	मोठया राज्यस्तरीय शैक्षणिक संस्थाचे नाव
१	पुणे विभाग	१.सहकार संचालनालय २.पणन संचालनालय, ३.साखर संचालनालय, ४.रोजगार व स्वयंरोजगार संचालनालय, ५.नोंदणी व मुद्रांक संचालनालय,	१.रयत शिक्षण संस्था,सातारा २.श्री.स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर, ३.डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे
२	नाशिक विभाग	१.समाजकल्याण संचालनालय, २.पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ, ३.राज्य आरोग्य प्रयोगशाळा	१.महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी,पुणे. २.मॉडर्न एज्युकेशन सोसायटी,पुणे ३.शिक्षण प्रसारक मंडळ,पुणे.
३	औरंगाबाद विभाग	१.क्रिडा संचालनालय, २.आरोग्य सेवा मंडळ, ३.फलोत्पादन संचालनालय, ४.कृषी संचालनालय ५.महिला व बाल कल्याण संचालनालय,	१.श्री.शाहू शिक्षण संस्था,पंढरपूर

४. सदर शासन परिपत्रक सर्व संबंधित प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिपत्याखाली असलेल्या सर्व विभाग प्रमुखांच्या/ नियुक्ती प्राधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणावे. त्यानुसार बिंदुनामावली तपासणीचे प्रस्ताव सर्व संबंधित सहायक आयुक्त, मागासवर्ग कक्ष यांच्या कार्यालयाकडे सादर करण्याची दक्षता घ्यावी.

५. सदरहू शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेताक २०१८०३२११५१३१६१४०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rasik Ambadas khadse

Digitally signed by Rasik Ambadas khadse
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=GAD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=46b7df2d2f9479d2bb9092a9859cf1644735a09d26dba77f04d38c1354b35457, cn=Rasik Ambadas khadse
Date: 2018.03.21 16:16:17 +05'30'

(र.अं.खडसे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. मा.सभापती, विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२. मा.अध्यक्ष, विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई-३२.
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई-३२.
५. सर्व मा. विधानसभा सदस्य/मा.विधानपरिषद सदस्य/मा.संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य.
६. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई-३५.
७. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
८. सर्व मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
९. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.
१०. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग.
११. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा), मुंबई.
१२. सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद), मुंबई.
१३. सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य.
१४. सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य.
१५. सर्व सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष), महाराष्ट्र राज्य.
१६. प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई.
१७. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई.
१८. प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
१९. प्रबंधक,महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई,नागपूर,औरंगाबाद.
२०. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य.
२१.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
२२.सचिव,राज्य निवडणूक आयोग,मंत्रालय, मुंबई-३२.
२३.सचिव,राज्य माहिती आयोग, मंत्रालय, मुंबई-३२.
२४. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त.
२५.राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक.

२६. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
२७.सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका.
२८.संचालक, समाजकल्याण, पुणे.
२९.आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक.
३०.संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
३१.संचालक, सेवायोजन, मुंबई.
३२.महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
३३.महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर.
३४.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
३५.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
३६.सर्व मंत्रालयीन विभाग, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या अधिपत्त्याखालील सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना सदर शासन निर्णयाची प्रत, त्यांच्या स्तरावरुन स्वतंत्रपणे पाठवून कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.
३७.ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन मुंबई. (५ प्रती)
३८.सर्व मान्यता प्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये,महाराष्ट्र राज्य.
३९.निवड नस्ती, कार्यासन १६-ब.